# आकाशचिंन्ह व परवाना विभाग

## जाहिर प्रकटन क्र. ०६ /२०२१-२२

---

पिंपरी चिंचवड हे शहर देशपातळीवर प्रगत औदयोगिक शहर म्हणुन ओळखले जाते. सध्या पिंपरी चिंचवड शहर स्मार्ट सिटीच्या दिशेने वाटचाल करीत आहे.तथापि,महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये महानगरपालिकेची परवानगी न घेता महापालिका जागेवर अनधिकृतपणे जाहिरात फलक लावले जात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे शहराचे विद्रुपीकरण होत आहे. तसेच नागरिकांना दृश्य प्रदूषणाला सामोरे जावे लागत आहे. शहराचा दुश्य आवकाश जास्तीत जास्त सुखवाह असावा यासाठी महापालिका प्रयत्नरत आहे. त्यामुळे अशा जाहिरात फलकांचे नियमन करणे महत्वाचे झाले आहे. शहरातील नागरीकांना आवश्यक माहितीचे प्रसारण करण्याचे असल्यास त्यासाठी रस्ता वहातुक सुरक्षा आणि शहर सौदर्य अबाधित राखून महानगरपालिकेतर्फे प्रत्येक क्षेत्रिय कार्यलयाचे कार्यक्षेत्रात निवडक ठिकाणी 6*10 व 8*14 फुट आकारमानाचे मजबूत आकर्षक फलक उभा केले जाणार आहेत. या जाहिरात फलकांवरती तात्पुरत्या स्वरुपात योग्य माहिती प्रसारण, सामाजिक उपक्रम, जनजागृती व्यक्तिंच्या वाढदिवस, श्रदांजली संबधीची जाहिरात, शुभेच्छा, अभिनंदन व इतर जाहिरातीसाठी १ ते ७ दिवसाकरिता परवाना देण्याची कार्यवाही आवश्यक ती फी भरुन क्षेत्रिय कार्यालयामार्फत करण्यात येणार आहे. हि सर्व प्रक्रिया पारदर्शक ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येईल.ज्याठिकाणी जाहिरात फलक उभे करता येतील अशा प्रस्तावीत जांगाची यादी तसेच निषिध्द व नकारात्मक जाहिरातींची यादी आणि परवाना देण्यासाठीच्या अटी/शर्ती यांचा तपशील महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.तसेच ही सर्व माहिती पालिकेच्या क्षेत्रिय कार्यालयाचे व आकाशचिंन्ह परवाना विभागामध्ये कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत समक्ष पहावयास मिळेल. या प्रस्तावाबाबत काही विधायक सूचना करवायाच्या असतील तर त्या आकाशचिन्ह व परवाना विभागाच्या तसेच सर्व प्रभाग कार्यालयाच्या अधिकृत मेल आयडी वरती तसेच अपवादात्मक परिस्थितीत या विभागांत समक्ष या जाहिर नोटीसीच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून आठ दिवसात लेखी स्वरूपात कळविण्यात याव्यात.

सही/-

क्र आप /०७/कावि/०९ /२०२२

दिनांक - ११/०१/२०२२

(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी,पुणे ४११०१८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी पुणे – ४११०१८.

# आकाशचिंन्ह व परवाना विभाग.

**मनपाचे क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत उभे केलेल्या जाहिरात फलक वापराबाबतच्या अटी/शर्ती.**

---

1) महानगरपालिकेमार्फत क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत उभे केलेल्या जाहिरात फलकांची यादी,स्थळ व मोजमाप त्या-त्या क्षेत्रीय कार्यालय व आकाशचिन्ह व परवाना विभागाचे वेबसाईटवरती प्रसिध्द करण्यात आलेली आहे.
2) इच्छुक व्यक्ती व संस्था यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावयाचे आहेत. त्यानंतर ऑनलाईन पध्दतीने परवाना देणेचे त्यावरती नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी संबंधीत क्षेत्रीय कार्यालयाची राहील.
3) सदर जाहिरात परवान्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 244,245 व सार्वजनिक मालमत्ता विरूपणास प्रतिबंध करण्याकरीता अधिनियम 1995 चे कलम 03 तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम-2003 लागू राहतील.
4) महानगरपालिकेमार्फत उभारणेत आलेल्या जाहिरात फलकांचे मोजमाप 06 X 10 व 08 X 14 अशी राहील. एवढ्या मोजमापाशिवाय जाहिरात फलकाचे लगत लाकडी अथवा लोखंडी सांगाडा उभा करून जाहिरात करता येणार नाही तसे निदर्शनास आल्यास संबंधीतावरती फौजदारी गुन्हा दाखल करणेत येईल.
5) जी जाहिरात लागणार आहे त्याची प्रत अर्जासोबत सादर करावयाची आहे. जाहिरातींची नकारात्मक यादी म्हणजे निषिध्द जाहिरातींचा तपशील प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात उपलब्ध आहेत. असा निषिध्द मजकूर असलेल्या जाहिराती नाकारल्या जातील.
6) परवाना मंजूर करणेचे अधिकार संबंधीत क्षेत्रीय अधिकारी यांना राहतील. त्यांचे रजेच्या कालावधीत त्यांचा कार्यभार ज्यांना आहे त्यांचेकडे हे अधिकार राहतील.
7) सदरच्या परवान्याची मुदत 01 दिवसापासुन जास्तीत जास्त 07 दिवस राहील.
8) सदरचे जाहिरात फलकावरती व्यक्तीच्या मृत्युसंबंधीची जाहिरात, वाढदिवस, शुभेच्छा व अभिनंदन जाहिरात 03 दिवस व इतर जाहिराती 01 ते 07 दिवस राहतील. या मर्यादेत बदल करण्याचे अधिकार क्षेत्रीय अधिकारी यांना राहतील मात्र अशी कुठलीही जाहिरात सात दिवसापेक्षा अधिक असणार नाही.
9) मंजूर केलेल्या परवान्याची मुदत संपल्यानंतर संबंधित जाहिरात तात्काळ काढून घेतली पाहिजे तसे न केलेस मनपातर्फे काढून घेणेत येईल.
10) सदरचा परवाना हा ज्यांचा अर्ज संबंधित जाहिरात फलकासाठी प्रथम येईल त्यास प्राधान्य राहील.
11) एकाच व्यक्तीस अथवा संस्थेस मंजूर परवान्याचे मुदतीलगत त्याच जाहिरातीसाठी परवाना मंजूर केला जाणार नाही. एकाच स्वरूपाची जाहिरात वेगवेगळ्या संस्था वा व्यक्तींच्या नावे अर्ज करून लावता येणार नाही. या बाबतीत क्षेत्रीय अधिकारी यांचे स्वविवेकानुसारचे आदेश अंतिम रहातील व या बाबत कुठल्याही प्राधिकरणाकडे तक्रार करता येणार नाही.
12) परवानासाठी मनपाचे संकेत स्थळावरून ऑनलाईन अर्ज सादर करावयाचा आहे. आलेल्या अर्जानुसार वेब लिंक वरती सर्व तपशील व आवश्यक रक्कम भरल्यानंतर परवाना डाऊनलोड करता होईल.
13) डाऊनलोड केलेला परवाना लावणेत येणा-या जाहिरातींचे उजव्या बाजूस फलकाचे खाली नागरिकांच्या लक्षात येईल असा छापणे बंधनकारक राहील. तसे न केलेस सदरचा परवाना जाहिरात फलक ही अनधिकृत समजण्यात येऊन मनपातर्फे काढुन घेण्यात येईल.
14) अपवादात्मक परिस्थितीत ऑफलाईन पध्दतीने देता येतील. या बाबतीत क्षेत्रीय अधिकारी यांचे स्वविवेकानुसारचे आदेश अंतिम रहातील व या बाबत कुठल्याही प्राधिकरणाकडे तक्रार करता येणार नाही.
15) एकाच बोर्डवरती एकाच दिवशी परवान्या संबंधी एक किंवा त्यापेक्षा जास्त अर्ज आलेस ज्याचा अर्ज पहिला त्यास प्रथम प्राधान्य देऊन परवाना दिला जाईल.
16) परवाना मंजूरीकामी राजकिय दबाव टाकता येणार नाही.
17) मंजूर केलेल्या जाहिरात परवान्याचे परस्पर हस्तांतरण करता येणार नाही.
18) जाहिरात परवाना मंजूर अथवा नामंजूर करणेचे अधिकार संबंधीत क्षेत्रीय अधिका-यांना राहील.

सही/-
( राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी 411018.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी,पुणे-१८

## प्रभागनिहाय फ्लेक्स करिता निश्चित करण्यात आलेल्या स्थळांची यादी

| अ.क्र | क्षेत्रीय कार्यालय | प्रभाग क्रमांक | स्थळ | प्रस्तावित मोजमाप |
|---|---|---|---|---|
| १ | **अ** | १० | भवानी माता मंदीर बस स्टॉप जवळ | 6x10 |
| २ | **अ** | १० | बॅर्ड व्हॅली उद्यान जवळ | 8x14 |
| ३ | **अ** | १० | शाहु उद्यान जवळ, शाहुनगर | 8x14 |
| ४ | **अ** | १० | सम्राट चौक, मोरवाडी | 8x14 |
| ५ | **अ** | १४ | हनुमान क्रिडागंण चौक, आकुर्डी हॉस्पीटल जवळ | 8x14 |
| ६ | **अ** | १४ | मंत्रा सोसा. जवळील मनपाची मोकळी जागा | 8x14 |
| ७ | **अ** | १४ | ऐश्वर्यम कम्फर्ट सोसा. जवळील मनपाची मोकळी जागा | 8x14 |
| ८ | **अ** | १५ | काचघर चौक, निगडी (लाल बहादुर शास्त्री चौक) | 8x14 |
| ९ | **अ** | १५ | रमादेवी सदाशिव वर्टी सभागृह चौक, जलशुध्दीकरण केंद्र जवळ | 8x14 |

| अ.क्र | क्षेत्रीय कार्यालय | प्रभाग क्रमांक | स्थळ | प्रस्तावित मोजमाप |
|---|---|---|---|---|
| १० | **अ** | १५ | हेडगेवार भवन कॉर्नर, हुतात्मा चौक (आनंद हॉस्पिटल समोर) | 8x14 |
| ११ | **अ** | १५ | संजय काळे ग्रेड सपरेटर रोड, रेल्वेकडील बाजु | 8x14 |
| १२ | **अ** | १५ | म्हाळसाकांत चौक, जम्बो किंग वडापाव | 8x14 |
| १३ | **अ** | १९ | भोईर शाळे समोर चौक, कामगार कल्याण केंद्र | 8x14 |
| १४ | **अ** | १९ | प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह गेट जवळ | 8x14 |
| १५ | **अ** | १९ | कामिनी हॉटेल समोर,अहिंसा चौक | 8x14 |
| १६ | **अ** | १९ | वाल्मिकी चौक, पिपंरी पुला जवळ | 8x14 |
| १७ | **अ** | १९ | एम्पायर इस्टेट कॉर्नर, जय हिंद कलेक्शन जवळ | 8x14 |

| अ.क्र | क्षेत्रीय कार्यालय | प्रभाग क्रमांक | स्थळ | प्रस्तावित मोजमाप |
|---|---|---|---|---|
| १ | **ब** | १६ | रावेत पोलिस स्टेशन भिंत | 8x14 |
| २ | **ब** | १६ | धर्मराज चौक रावेत | 8x14 |
| ३ | **ब** | १६ | मुकाई चौक बस स्टॉप भिंत रावेत | 6x10 |
| ४ | **ब** | १६ | शिंदे पेट्रोल पंप विकासनगर | 6x10 |
| ५ | **ब** | १७ | SKF कंपनी नाल्याजवळ | 8x14 |
| ६ | **ब** | १७ | बिजलीनगर MSEB भिंती शेजारी | 8x14 |
| ७ | **ब** | १७ | स्पाईन रस्ता म्हाडा भिंजीजवळ | 6x10 |
| ८ | **ब** | १७ | जुना जकात नाका सुलभ शौचालयाजवळ | 8x14 |
| ९ | **ब** | १७ | स्पाईन रस्ता Open Gym जवळ | 6x10 |
| १० | **ब** | १८ | केशवनगर शाळा सिमाभिंत चिंचवडगाव | 8x14 |
| ११ | **ब** | १८ | जिजाऊ  उद्यान सिमाभिंत  चिंचवडगाव | 8x14 |

| अ.क्र | क्षेत्रीय कार्यालय | प्रभाग क्रमांक | स्थळ | प्रस्तावित मोजमाप |
|---|---|---|---|---|
| १२ | **ब** | १८ | दफनभुमी सिमाभिंत जवळ चिंचवडगाव | 8x14 |
| १३ | **ब** | १८ | मोरया हॉस्पीटल समोर Transformer जवळ चिंचवडगाव | 6x10 |
| १४ | **ब** | २२ | छत्रपती शिवाजी चौक (बी.आर.टी) एम.एम.चौक काळेवाडी | 6x10 |
| १५ | **ब** | २२ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका शाळा (विजयनगर) | 8x14 |
| १६ | **ब** | २२ | ज्योतिबा गार्डन सिमाभिंत काळेवाडी | 8x14 |

| अ.क्र | क्षेत्रीय कार्यालय | प्रभाग क्रमांक | स्थळ | प्रस्तावित मोजमाप |
|---|---|---|---|---|
| १ | **क** | २ | CNG गॅस पंपाजवळ शिवरस्ता कॉर्नर | 8x14 |
| २ | **क** | २ | विठ्ठल मंदीरा पाठीमागील बाजू CNG पंपाकडे जाणारा रस्ता | 8x14 |
| ३ | **क** | २ | शिवरस्ता नियोजित COEPकॉलेज च्या कॉर्नर जवळ | 8x14 |
| ४ | **क** | २ | शिवरस्ता लक्ष्मी चौक जवळ | 8x14 |
| ५ | **क** | २ | International Convention Center च्या कॉर्नरला नाशिक हायवे जवळ | 8x14 |
| ६ | **क** | ६ | नविन भोसरी रुग्णालया शेजारी | 8x14 |
| ७ | **क** | ८ | बालनगरी सिमाभिंतीच्या आत | 8x14 |
| ८ | **क** | ८ | ई क्षेत्रीय कार्यालयाची सिमाभिंत | 8x14 |
| ९ | **क** | ८ | आरटीओ शेजारी पाण्याची टाकी भिंती शेजारी | 8x14 |
| १० | **क** | ८ | संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल | 8x14 |
| ११ | **क** | ८ | स्पाईन रोड ब्रील खाली चौकात | 8x14 |

| अ.क्र | क्षेत्रीय कार्यालय | प्रभाग क्रमांक | स्थळ | प्रस्तावित मोजमाप |
|---|---|---|---|---|
| १२ | **क** | ९ | यशवंतनगर चौक नेहरुनगर यशवंतनगर बसस्थानकाच्या जवळील मोकळी जागा | 8x14 |
| १३ | **क** | ९ | आण्णासाहेब मगर स्टेडीयम चौक, नेहरुनगर स्टेडीयमच्या भिंतीलगतची मोकळी जागा | 8x14 |
| १४ | **क** | ९ | संतोषीमाता चौक नेहरूनगर, नेहरूनगर बसस्थानक जवळील मोकळी जागा | 8x14 |
| १५ | **क** | ९ | भरत चरण चौक, नेहरुनगर HA लगतची बाजू बस स्थानकाच्या बाजूची जागा | 8x14 |
| १६ | **क** | ९ | झीरो वॉईज चौक नेहरूनगर, रस्त्याच्या बाजूला फुटपाथ वर | 8x14 |

| अ.क्र | क्षेत्रीय कार्यालय | प्रभाग क्रमांक | स्थळ | प्रस्तावित मोजमाप |
|---|---|---|---|---|
| १ | **ड** | २५ | भुमकर चौक, वाकड | 8x14 |
| २ | **ड** | २६ | बापुजीबुवा चौक, पिंपळे निलख | 8x14 |
| ३ | **ड** | २६ | सावित्रीबाई फुले उद्यानालगत, पिंपळे निलख | 8x14 |
| ४ | **ड** | २६ | इंगवले चौक, पिंपळे निलख | 8x14 |
| ५ | **ड** | २६ | उत्कर्ष चौक, वाकड – पिंपळे निलख | 8x14 |
| ६ | **ड** | २८ | कोकणे चौक, पिंपळे सौदागर | 8x14 |
| ७ | **ड** | २८ | पी.के. चौक, पिंपळे सौदागर | 8x14 |
| ८ | **ड** | २९ | सृष्टी चौक, पिंपळे गुरव | 8x14 |
| ९ | **ड** | २९ | पिंपळे गुरव बसस्टॉप चौक | 8x14 |

| अ.क्र | क्षेत्रीय कार्यालय | प्रभाग क्रमांक | स्थळ | प्रस्तावित मोजमाप |
|---|---|---|---|---|
| १ | **इ** | ३ | मनपा शाळेजवळ, च-होली चौक | 8x14 |
| २ | **इ** | ३ | मनपा शाळेजवळ, मोशी चौक | 8x14 |
| ३ | **इ** | ३ | साई मंदिर जवळ, पुणे-आंळदी रस्ता | 8x14 |
| ४ | **इ** | ३ | दिघी पोलिस स्टेशन जवळ, पुणे आळंदी रस्ता | 8x14 |
| ५ | **इ** | ४ | मॅगझीन चौक बी.आर.टी. रोड | 8x14 |
| ६ | **इ** | ४ | दत्तनगर चौक चौक बी.आर.टी. रोड | 8x14 |
| ७ | **इ** | ४ | जकात नाका चौक बी.आर.टी. रोड | 8x14 |
| ८ | **इ** | ५ | भोसरी आळंदी रोड माई वडेवाले चौक | 6x10 |
| ९ | **इ** | ५ | भोसरी आळंदी रोड मंगलमुर्ती मेडिकल | 8x14 |
| १० | **इ** | ५ | दिघी रोड फुगे प्रायईम | 8x14 |
| ११ | **इ** | ५ | दिघी रोड हरी ओम स्वीट मार्क | 8x14 |

| अ.क्र | क्षेत्रीय कार्यालय | प्रभाग क्रमांक | स्थळ | प्रस्तावित मोजमाप |
|---|---|---|---|---|
| १२ | **इ** | ७ | पी. एम. टी चौक भोसरी | 8x14 |
| १३ | **इ** | ७ | पी.सी.एम.टी चौक भोसरी | 8x14 |
| १४ | **इ** | ७ | बापुजी बुआ चौक भोसरी | 8x14 |
| १५ | **इ** | ७ | लांडेवाडी कमान शेजारी भोसरी | 8x14 |
| १६ | **इ** | ७ | लांडेवाडी शिवाजी चौक शेजारी | 8x14 |

| अ.क्र | क्षेत्रीय कार्यालय | प्रभाग क्रमांक | स्थळ | प्रस्तावित मोजमाप |
|---|---|---|---|---|
| १ | **फ** | प्रभाग क्रं- १ | राधास्वामी आश्रम रोड | 8x14 |
| २ | **फ** | प्रभाग क्रं- १ | राधास्वामी आश्रम,  सोनवणेवस्ती कॉंनर | 6x10 |
| ३ | **फ** | प्रभाग क्रं- १ | भारत वजन काटा देहू आळंदी रोड | 8x14 |
| ४ | **फ** | प्रभाग क्रं- ११ | कृष्णानगर चौक | 8x14 |
| ५ | **फ** | प्रभाग क्रं- ११ | म्हेत्रेवस्ती चौक | 6x10 |
| ६ | **फ** | प्रभाग क्रं- ११ | घरकुल चौक | 8x14 |
| ७ | **फ** | प्रभाग क्रं- ११ | कुदळवाडी चौक | 8x14 |
| ८ | **फ** | प्रभाग क्रं- ११ | त्रिवेणीनगर चौक | 6x10 |
| ९ | **फ** | प्रभाग क्रं- १२ | तळवडे चौक | 8x14 |
| १० | **फ** | प्रभाग क्रं- १२ | कॅंनबे चौक | 8x14 |
| ११ | **फ** | प्रभाग क्रं- १२ | जोतिबा मंदिरासमोर | 6x10 |

| अ.क्र | क्षेत्रीय कार्यालय | प्रभाग क्रमांक | स्थळ | प्रस्तावित मोजमाप |
|---|---|---|---|---|
| १२ | **फ** | प्रभाग क्रं- १२ | शिवरकर चौक | 6x10 |
| १३ | **फ** | प्रभाग क्रं- १२ | रुपीनगर चौक | 8x14 |
| १४ | **फ** | प्रभाग क्रं- १३ | दुर्गानगर चौक | 8x14 |
| १५ | **फ** | प्रभाग क्रं- १३ | अंकुश चौक | 6x10 |
| १६ | **फ** | प्रभाग क्रं- १३ | चिकन चौक, त्रिवेणीनगर चौक | 6x10 |
| १७ | **फ** | प्रभाग क्रं- १३ | माता अमृतानंदनमयी शाळेसमोर | 6x10 |
| १८ | **फ** | प्रभाग क्रं- १३ | महाराष्ट्र बँक चौक | 8x14 |
| १९ | **फ** | प्रभाग क्रं- १३ | सारस्वत बॅक समोर निगडी गावठाण | 8x14 |
| २० | **फ** | प्रभाग क्रं- १३ | मॉर्डन कॉलेज चौक | 8x14 |
| १ | **ग** | २१ | डिलक्स चौक | 8x14 |
| २ | **ग** | २१ | पवनेश्वर चौक | 8x14 |

| अ.क्र | क्षेत्रीय कार्यालय | प्रभाग क्रमांक | स्थळ | प्रस्तावित मोजमाप |
|---|---|---|---|---|
| ३ | **ग** | २३ | पॉवर हाऊस चौक | 6x10 |
| ४ | **ग** | २३ | पवारनगर चौक, बारणे कॉर्नर जवळ थेरगाव | 8x14 |
| ५ | **ग** | २३ | होमटेल हॉटेल समोर, आदित्य बिर्ला हॉस्पिटल चौक | 6x10 |
| ६ | **ग** | २३ | थेरगाव गावठाण कमान समोरील चौक, थेरगाव हॉस्पिटल | 8x14 |
| ७ | **ग** | २४ | कुणाल रेसीडन्सी नाल्याजवळील रस्ता | 6x10 |
| ८ | **ग** | २४ | लोकमान्य कॉलनी समोर गणेश नगर | 6x10 |
| ९ | **ग** | २७ | आदित्य बिर्ला हॉस्पिटल जवळील पुलाशेजारी | 8x14 |
| १० | **ग** | २७ | रहाटणी फाटा | 8x14 |

| अ.क्र | क्षेत्रीय कार्यालय | प्रभाग क्रमांक | स्थळ | प्रस्तावित मोजमाप |
|---|---|---|---|---|
| १ | **ह** | **२० संततुकाराम नगर** | पिंपरी चौक | 8x14 |
| २ | **ह** | २० | पी.सी.एम.सी मार्केट जवळ | 8x14 |
| ३ | **ह** | २० | सुखवाणी कॉम्पलेक्स समोरील रस्ता | 8x14 |
| ४ | **ह** | ३० | सी.एन.जी.पंप मेगा मार्ट चौक फुगेवाडी | 8x14 |
| ५ | **ह** | **३१ नवी सांगवी** | साई चौक | 8x14 |
| ६ | **ह** | ३१ | काशी विश्वेरश्वर  शाळा | 8x14 |
| ७ | **ह** | | नर्मदा गार्डन चौक | 8x14 |
| ८ | **ह** | | जुनी सांगवी शेवटचा बसस्टॉप | 8x14 |

**आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी,पुणे-१८**

**सूचना पाठविण्यासाठी आवश्यक मेल आयडी**

आकाशचिन्ह परवाना विभाग skysign@pcmcindia.gov.in

अ क्षेत्रीय कार्यालय azone@pcmcindia.gov.in

ब क्षेत्रीय कार्यालय bzone@pcmcindia.gov.in

क क्षेत्रीय कार्यालय czone@pcmcindia.gov.in

ड क्षेत्रीय कार्यालय dzone@pcmcindia.gov.in

ई क्षेत्रीय कार्यालय ezone@pcmcindia.gov.in

फ क्षेत्रीय कार्यालय fzone@pcmcindia.gov.in

ग क्षेत्रीय कार्यालय gzone@pcmcindia.gov.in